# श्रीपतराव चौगुले कॉलेजमध्ये ८० वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा




श्रीपतराव चौगुले कॉलेजमध्ये स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण करताना सुभेदार मेजर नारायण लक्ष्मण पाटील समवेत डॉ. के. एस. चौगुले, शिवाजीराव पाटील, मारुती चौगुले, डॉ. अजय चौगुले, प्रकाश पाटील, प्रा. वेदिका चौगुले, डॉ. विजयकुमार पाटील, डॉ. संगीता पिसे, डॉ. उषा पवार, तेजस्विनी पाटील, गजानन शिंदे, सुरेश पाटील, प्रा. प्रतिभा पाटील, उर्मिला चौगुले, सी. डी. सी. सदस्य सागर वरपे व मान्यवर

श्रीपतराव चौगुले आर्ट्स ॲण्ड सायन्स कॉलेज, माळवाडी - कोतोली येथे देशभक्तीमय वातावरणात **८० वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा** करण्यात आला. स्वातंत्र्यदिनानिमित्त ध्वजारोहण **सुभेदार मेजर नारायण लक्ष्मण पाटील** यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक-अध्यक्ष **मा. डॉ. के. एस. चौगुले** होते.

कार्यक्रमास संस्थेचे सचिव शिवाजीराव पाटील, खजिनदार मारुती चौगुले, संस्था संचालक प्रकाश पाटील, प्रा. डॉ. अजय चौगुले, प्रा. वेदिका चौगुले, प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील, डॉ. संगीता पिसे, डॉ. उषा पवार, तेजस्विनी पाटील, गजानन शिंदे, सुरेश पाटील, प्रा. प्रतिभा पाटील, उमिला चौगुले तसेच सी.डी.सी. सदस्य सागर वरपे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संयोजन **एन.सी.सी. अधिकारी लेफ्टनंट डॉ. मनीषा सावंत** यांनी केले. पाहुण्यांना आमंत्रण व ध्वजारोहण मानवंदना एन.सी.सी. कॅडेट आदित्य पाटील यांनी दिली. यावेळी राष्ट्रीय छात्र सेनेच्या कॅडेट्सनी आकर्षक परेड सादर केली. तसेच श्री. के. एस. चौगुले सेमी इंग्रजी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर संगीत कार्यक्रम सादर केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत लेफ्टनंट डॉ. मनीषा सावंत यांनी केले, तर सूत्रसंचालन प्रा. रविंद्र चौगुले यांनी केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**देशभक्ती, शिस्त आणि राष्ट्रनिष्ठेचा संदेश देणारा हा स्वातंत्र्यदिन सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.**